क्रमांक : का.स./बैठक/२०१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १९ मे, २००३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २४ एप्रिल, २००३ (गुरुवार) रोजी झालेल्या २०१ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

शासनाचे मुख्य सचिव
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री.द.म.सुकथनकर
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री.र.य.तांबे
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५. - सदस्य

श्री.हरिशंकरन्
व्यवस्थापकीय संचालक,
स्कुलनेट इंडिया लिमिटेड,
बीजीएस अँड सन्स बिल्डींग,
१६६, सीएसटी रोड, कालिना, सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई - ४०० ०९८. - सदस्य

शासनाचे प्रधान सचिव
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

...२/-

महापालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१. - सदस्य

शासनाचे प्रधान सचिव
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

व्यवस्थापकीय संचालक
सिडको, निर्मल, नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३. - सदस्य

महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण. - सदस्य

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २०१ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २४ एप्रिल , २००३ (गुरुवार) |
| वेळ | : | सकाळी ११.३० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.सुभाष लाला<br>शासनाचे सचिव,<br>नगर विकास विभाग

श्री.विश्वास धुमाळ<br>शासनाचे प्रधान सचिव (उद्योग),<br>उद्योग व उर्जा विभाग

श्री.जयंत कावळे<br>शासनाचे सचिव (पर्यावरण)<br>पर्यावरण विभाग

डॉ.टी. चंद्रशेखर
प्रकल्प संचालक/सह महानगर आयुक्त,

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : दिनांक २० फेब्रुवारी, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०० व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक २० फेब्रुवारी, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०० व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालातील खालील बाब टिप्पणीवर चर्चा झाली व निर्णय घेण्यात आला :-

बाब क्र.५ :- विक्रांत युध्दनौकेचे सागरी वस्तुसंग्रहालयात रुपांतर करणे - विक्रांत युध्दनौकेची दुरुस्ती करण्यासाठी भारतीय नौदलास रु.१ कोटी देण्याबाबत.

अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विक्रांत युध्दनौकेचे सागरी वस्तुसंग्रहालयात रुपांतर करण्याच्या प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.मुख्यमंत्री व मा.उप-मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करणे आवश्यक आहे असे सांगितले. त्यानंतर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी सदरची बैठक आयोजित करावी अशा सुचना दिल्या.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**बाब क्र.३ : मुंबई नागरी सुविधा प्रकल्प (मुं.ना.सु.प्र.)**

३.१ प्रकल्प संचालक/सह-महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक २२.८.२००२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्राधिकरणाने मुंबईत नागरी सुविधांची मोठी व महत्वाची कामे हाती घ्यावी असे निर्देश अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिले होते असे सांगितले. त्यानुसार, प्राधिकरणाच्या अधिनियमात दुरुस्ती करण्यात आली आहे. प्राधिकरणाने मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाची बृहत योजना (Master Plan) तयार करण्याकरीता मे.कन्सल्टिंग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस (CES) या सल्लागारांची नेमणूक केली आहे. सल्लागारांनी उपनगरासाठी मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाच्या बृहत योजनेचा आराखडा तयार केला आहे. त्यामध्ये प्राधान्य क्र.१ मधील योजनेसाठी सुमारे रु.१५८९.१५ कोटीच्या

प्राधान्य क्र.२ मधील योजनेसाठी सुमारे रु.२३०.६६ कोटी व प्राधान्य क्र.३ योजनेसाठी रु.१६१.६० कोटी इतक्या खर्चाच्या नागरी सुविधा योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

३.२ प्रकल्प संचालक व सह-महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाचा अंतिम बृहत योजना आराखडा तयार करण्यापूर्वी अभ्यास अवलोकन समितीची (Study Review Committee) स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका / सार्वजनिक बांधकाम विभाग / महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ / महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ / मुंबई बंदर न्यास / बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम / वाहतुक पोलीस इ. संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे व सदर समितीने दिलेल्या सुचना विचारात घेऊन अंतिम अहवाल तयार करण्यात आला आहे. प्रकल्प संचालक/ सह-महानगर आयुक्त यांनी पुढे असेही नमूद केले की, सदरहू, तयार करण्यात आलेली मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाची बृहत योजना कार्यकारी समितीच्या शिफारशी विचारात घेऊन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. मुंबई बेटाचा (Island City) अहवाल एप्रिलच्या शेवटी प्राधिकरणास प्राप्त होईल.

३.३ मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाचा बृहत योजनेवर विचार व निर्णय घेण्यापूर्वी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी सदरहू प्रकल्पाकरीता सुमारे रु.२०००/- कोटी इतका खर्च अपेक्षित आहे तसेच त्यामध्ये प्रकल्पासाठी करावा लागणारा आकस्मिक खर्च, किंमतीत होणारी वाढ, भूसंपादन व पुनर्वसन इत्यादींचा समावेश नाही असे निदर्शनास आणले. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची बृहतयोजनेसाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. प्राधिकरणाकडून सदर योजनेसाठी खात्रीपूर्वक किती निधी उपलब्ध होऊ शकेल तसेच इतर विविध स्त्रोतातून निधी कसा उपलब्ध होऊ शकेल याचा सखोल अभ्यास करुन, नंतरच हयावर निर्णय घेणे अधिक योग्य होईल असेही प्रतिपादन केले.

३.४ प्रकल्प संचालक/सह-महानगर आयुक्त यांनी सदरहू प्रकल्पास लागणारा निधी प्राधिकरणाकडून, शासनाच्या अर्थसंकल्पाच्या तरतूदीमधून, केंद्र शासनाच्या योजनेमधून, पथकरातून, उड्डाणपुलाच्या खालील जागेचा वाणिज्यिक उपयोग करुन तसेच इमारतींवर काही प्रमाणात कर आकारुन इ. मार्गाने

उभा करता येऊ शकेल असे सांगितले. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी निधीच्या स्त्रोताचा आढावा घेताना व शासनाच्या सद्य आर्थिक परिस्थितीचा विचार करता प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात लागणारा निधी उभारणे शक्य होणार नाही. तसेच प्राधिकरणाकडून खात्रीपूर्वक उपलब्ध होणा-या निधीमधून राबविता येईल एवढयाच किंमतीच्या प्रकल्पाचा प्रथम विचार करण्यात यावा व प्रकल्पाची अंमलबजावणी निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने करण्यात यावी असेही सांगितले.

३.५ श्री.सुकथनकर, सदस्य यांनी असे सांगितले की, संपूर्ण आराखडयास तत्वतः मान्यता देण्याऐवजी जी कामे प्राथम्य एक मध्ये करावयाची आहेत त्याच कामांचे फक्त आराखडे व अंदाजित खर्चाचा सविस्तर तपशील तयार करावा. इतर सर्व कामाचे आराखडे व खर्चाचा तपशील प्रकल्पासाठी लागणारा निधी उपलब्ध झाल्यानंतरच तयार करण्यात यावा अन्यथा यावर होणारा खर्च व्यर्थ ठरेल. अहवालामध्ये दिलेल्या सर्व योजनाचे आराखडे व अंदाजित खर्चाचा तपशिल तयार केल्यास सल्लागाराने दिलेल्या योजनाच्या प्रवर्ग १, २, ३ मध्ये परिस्थिती तसेच काळानुसार बदल होण्याची शक्यता आहे असेही सांगितले.

३.६ श्री.कानडे यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पुरेसा निधी नसल्यामुळे योजनेस अर्थसहाय्य देण्याची शक्यता कमी आहे. त्यानंतर सल्लागारांनी सादरीकरण (Presentation) केले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सभोवतातील रस्ते जे पूर्वी प्रवर्ग-२ मध्ये अंतर्भूत करण्यात आले होते ते प्रवर्ग-१ मध्ये घेण्याचे ठरले. (सुधारीत जोडपत्र-१)

३.७ प्रधान सचिव (उद्योग), उद्योग व उर्जा विभाग यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी मुंबई नागरी परिवहन प्रकल्प/मुंबई नागरी पायाभूत सुविधा हया सारख्या प्राप्ती न होणा-या प्रकल्पावर (without any returns) खर्च झाल्यास प्राधिकरण इतर स्थानिक संस्थांना मुलभूत सोयीकरीता यापुढे अर्थसहाय्य करु शकणार नाही. प्राधिकरणाची स्थापना ही मुंबई महानगर प्रदेशाचा विकास करण्याकरीता झाली आहे. तसेच सदरहू प्रकल्पाकरीता लागणारा निधी इतर मार्गाने उभा करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

३.८ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मुंबईच्या वाहतुकीच्या समस्येचा विचार करता हा प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. परंतु, सदरहू प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात खर्च करावा लागणार असल्यामुळे प्रकल्प टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात यावा व सल्लागाराने अहवालामध्ये जी कामे प्राथम्याने (प्रवर्ग-१ मध्ये) अंदाजित किंमत रु.१५५०/- कोटीची कामे नमूद केली आहेत ती हाती घ्यावीत असे सांगितले.

३.९ पुढे अध्यक्षांनी असेही सांगितले की, सदरहू प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर संलग्न संस्थांनी काही प्रमाणात निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यापूर्वी मुंबईतील उड्डाणपूल बांधताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास काही प्रमाणात अर्थसहाय्य केलेले आहे.

३.१० वरील सर्व बाबींचा विचार करुन कार्यकारी समितीने असे ठरविले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करावी व जी कामे अहवालामध्ये प्राथम्याने प्रवर्ग -१ मध्ये करावी असे नमूद केले आहे व त्या कामाचे सविस्तर आराखडे व अंदाजित खर्चाचा तपशील निधीच्या उपलब्धतेनुसार तयार करण्यास सांगण्यात यावे. उर्वरीत कामाचे आराखडे/अंदाजित खर्चाच्या किंमतीचा तपशील निधी उपलब्ध झाल्यानंतर तयार करण्यात यावा अशी शिफारस प्राधिकरणास करण्यात यावी.

३.११ सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कन्सल्टंटची नेमणूक, निविदा मागविणे, निविदेस मंजूरी देणे आणि अन्य अनुषंगिक बाबींची कार्यवाही सप्टेंबर, २००३ पर्यंत पूर्ण करावी व या प्रकल्पाअंतर्गत हाती घ्यावयाची कामे ऑक्टोबर, २००३ पासून सुरु करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करावी असे अध्यक्षांनी निर्देश दिले.

३.१२ त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८७२</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,

१९७४ च्या कलम ७ च्या उपकलम ३ (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन कार्यकारी समितीने मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाच्या बृहत योजनेच्या आराखडयास बाब क्र.३ मध्ये नमूद केलेल्या टिप्पणी प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. तसेच मुंबई नागरी सुविधा प्रकल्पास मंजूरी देण्याची शिफारस प्राधिकरणास करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाद्वारे मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाच्या (MUIP) मंजूरीच्या आधिन राहून या ठरावानुसार प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाच्या महानगर आयुक्तांना याद्वारे खालील बाबींकरीता कार्यकारी समितीचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत :-

१. मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे धोरण निश्चित करणे (Implementation Strategy of MUIP).

२. प्रकल्पाअंतर्गत विविध कामांची जागा व तेथील स्थिती पाहून करारांची संख्या ठरविणे.

३. आवश्यक त्या ठिकाणी कामांच्या व्याप्तीमध्ये किरकोळ स्वरुपाचा बदल करणे.

४. प्रकल्पाच्या मंजूर किंमतीच्या अधिन राहून तपशिलवार डिझाईन्समुळे प्राकलनाच्या खर्चात (२०% पर्यंत जास्त किंवा कमी) होणा-या बदलास मान्यता देणे.

५. प्रकल्प राबविण्यासाठी सर्व प्रकारच्या तांत्रिक बाबी ठरविणे.

६. कार्यकारी समितीने दि.२०.२.२००३ च्या ठराव क्र. ८६६ अन्वये मान्यता दिलेल्या कंन्सल्टंटच्या संक्षिप्त यादीनुसार प्रकल्प व्यवस्थापन कंन्सल्टंटची नेमणूक करणे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** या ठरावानुसार प्रकल्पाच्या यशस्वीरीत्या अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाच्या महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या रस्ते घटकातील प्रकल्पाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व इतर संस्थाद्वारे मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाची (MUIP) अंमलबजावणी करण्यात यावी. या मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाची (MUIP) अंमलबजावणी मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या कार्यपध्दतीप्रमाणे ठेवावी असे निर्देश अध्यक्षांनी दिले."

**<u>बाब क्र.४</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचे वळकटीकरण करण्याच्या कामाच्या निविदा मंजूर करण्याबाबत</u>**

४.१ मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी रस्त्याच्या भाग १ व ३ च्या कामाच्या निविदेबाबतची पार्श्वभूमी प्रकल्प संचालक/सह-महानगर आयुक्त यांनी थोडक्यात विशद केली. संदर्भात प्रकल्प संचालक/सह-महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, सदर कामाच्या निविदा वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन मागविण्यात आल्या होत्या व एकूण ३८ निविदाकारांनी कोरे निविदा संच खरेदी केले होते. त्यापैकी ६ निविदाकारांनी आपल्या निविदा सीलवंद लखोटयामध्ये दिनांक १०.३.२००३ रोजी सादर केल्या. प्राप्त निविदांची निविदोत्तर पात्रता (Post Qualification) छाननी केल्यानंतर दोन निविदा अपात्र ठरविण्यात आल्या. उर्वरित ४ पात्र निविदांपैकी मे.एन.सी.सी. - मायथस - महावीर यांची रु.६६०,४१८,५८९/- निविदा ही लघुत्तम व विनाशर्त आहे. निविदेतील देकार किंमतीच्या तुलनेत सुमारे १०.५३ टक्के कमी दराचा आहे. प्रकल्प संचालक/ सह-महानगर आयुक्त यांनी पुढे असेही नमूद केले की, ही निविदा जॉईंट व्हेंचर पध्दतीची असून मे.एन.सी.सी. - मायथस - महावीर यापैकी एन.सी.सी. या भागीदाराने यापूर्वी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे मुंबई पुणे द्रुतगती मार्गाच्या काही भागांचे बांधकाम यशस्वीपणे पूर्ण केले आहे.

४.२ कार्यकारी समितीने बाब टिप्पणीवर चर्चा करुन पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८७३</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ च्या उपकलम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन कार्यकारी समिती मे.एन.सी.सी.मायथस व महावीर जॉईंट व्हेंचर यांची सुधारीत व लघुत्तम निविदा रक्कम रु.६६०,४१८,५८९/- (रु.सहासष्ट कोटी चार लक्ष अठरा हजार पाचशे एकोणनव्वद फक्त) जागतिक बँकेच्या 'ना हरकतीस' अधीन राहून मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या ठरावानुसार प्रकल्पाच्या यशस्वी पूर्णतेपर्यंत करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याकरीता प्राधिकरणाच्या महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

## <u>बाब क्र.५</u> : <u>मुंबईमध्ये अंधेरी-घाटकोपर मार्गाच्या लगत सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणी करीता प्रस्ताव</u>

५.१ कार्यकारी समितीच्या दिनांक २० फेब्रुवारी, २००३ रोजी झालेल्या बैठकीत अंधेरी-घाटकोपर मार्गावर सुरक्षिततेचा विचार करता स्काय बसपेक्षा जलद वाहतुक Mass Rapid Transit तंत्रज्ञान राबविण्याची शिफारस कार्यकारी समितीने केली होती. वरील संदर्भित कार्यकारी समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन श्री.शिवकुमारन्, सल्लागार (एमआरटीएस) यांनी एमआरटीएसची पार्श्वभूमी सांगितली. तसेच त्यांनी प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही योजना समितीपुढे विचारार्थ ठेवली :-

(१) महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार मार्फत प्रस्ताव पाठवून द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय संस्थांद्वारा निधीच्या पुरवठयाची शक्यता पडताळून पहाणे,

(२) वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी, देकारांच्या दस्तऐवजांना अंतिम स्वरुप देण्याकरीता माहिती मिळविण्याच्या दृष्टीकोनातून बांधकाम संस्थांकडून (Construction Firm) आणि जागतिक पुरवठादारांकडून स्वारस्याबाबत देकार मागविणे (Expression of Interest),

(३) या दरम्यान यापूर्वीचा जर्मन सल्लागारांचा अहवाल अद्ययावत करणे, 'बांधा, चालवा, हस्तांतरण' या तत्वावर निविदांचा दस्तऐवज तयार करण्याकरीता पुढील कार्यवाही करणे, या संदर्भात स्काय बस मेट्रो अभ्यासाकरीता या आधी नियुक्त करण्यात आलेल्या मेसर्स सीईएस मर्यादित मार्फत जर्मन सल्लागारांचा अहवाल अद्ययावत करणे

आणि 'बांधा, वापरा आणि हस्तांतरण' या तत्वावर आधारित निविदा तयार करुन घेणे. (सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे हा अंमलबजावणीचा एक भाग असेल.)

(४) स्वारस्याच्या देकारास आलेला प्रतिसाद विचारात घेऊन देकारांचे दस्तऐवज त्यानुसार बदलणे आणि संक्षिप्त सूची संस्थांकडून देकार मागविणे,

(५) देकारांचे मूल्यमापन करुन निविदाकारांची निवड करणे

(६) प्रकल्पाची अंमलबजावणी तातडीने करणे शक्य होण्याकरीता Special Purpose Vehicle च्या (विशेष उद्दिष्ट वाहन) निर्मितीकरीता कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात येईल. तो पर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ही प्रमुख संस्था (Nodel Agency) म्हणून कार्य करेल.

५.२ बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर, अंधेरी-घाटकोपर मार्गावर प्रस्थापित आणि अनुभवसिध्द तंत्रज्ञानावर आधारित सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणीकरीता कार्यकारी समितीने मान्यता दिली. तसेच बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.३.१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रस्तावित अंमलबजावणीच्या धोरणास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

५.३ कार्यकारी समितीने आणखी असेही निदेश दिले की, दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळातर्फे (डिएमआरएस) तयार करण्यात येणा-या एकूण बृहत योजनेच्या एकात्मित भाग म्हणून अंधेरी-घाटकोपर मार्गाचा विचार व्हावा.

५.४ कार्यकारी समितीने असे स्पष्ट केले की, स्वारस्याबावतचे देकार मागविण्याकरीता यावेळी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि, सवलतदार निविदाकारांची निवड (Selection of Concessionaire) केल्यानंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सुरुवात करण्यापूर्वी शासनाची व इतर संबंधीत संस्थांची आणि कार्यकारी समितीची मान्यता आवश्यक ठरेल.

५.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८७४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ (३) (ii) अन्वये कार्यकारी समितीस जे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्यांचा उपयोग करुन कार्यकारी समिती खालील बाबींना तत्वतः मान्यता देत आहे :-

१. अंधेरी-घाटकोपर मार्गावर प्रस्थापित आणि अनुभवसिध्द तंत्रज्ञानावर आधारीत सार्वजनिक जलद वाहतुक (आरआरटी/एलआरटी) व्यवस्थांची अंमलबजावणी करणे.

२. स्वारस्याचे देकार मागविणे (Invitation of Expression of Interest) व प्रतिसादावर आधारित देकारांचे दस्तऐवज सुधारीत करुन संक्षिप्त सूची संस्थांकडून निविदा मागविणे.

३. एमआरटीएस (आरआरटी/एलआरटी) च्या अंमलबजावणीकरीता योग्य त्या सल्लागाराची नेमणूक करुन जर्मन सल्लागारांनी केलेला अहवाल अद्ययावत करुन घेणे व आवश्यक असणा-या इतर कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

बाब क्र.६ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल (कालावधी फेब्रुवारी, २००३ ते मार्च, २००३).

प्राधिकरणाकडील फेब्रुवारी, २००३ ते मार्च, २००३ पर्यंतच्या असलेल्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**बाब क्र.७ : प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-यांच्या शासकीय निवासस्थानाच्या घरभाडयाची रक्कम बाजारभावाप्रमाणे शासनास अदा करण्याबाबत.**

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८७५ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** श्री.बोंगिरवार, तत्कालीन अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी) हे रहात असलेल्या शासकीय निवासस्थानाचे बाजारभावानुसार घरभाडे व त्यांच्या वेतनातून वसूल करण्यात आलेली घरभाडे भत्ता, अनुज्ञप्ती शुल्क आणि सेवाशुल्क यांची रक्कम वजा जाता दिनांक १ मार्च, २००२ ते दिनांक १२ जानेवारी, २००३ या कालावधीतील फरकाची रक्कम प्राधिकरणाने स्वतःच्या निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागास अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** श्री.अरुणकुमार मागो, महानगर आयुक्त सद्या रहात असलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या निवासस्थानाचे बाजारभावानुसार घरभाडे / वाढीव भाडे यांची मागणी आल्यास तसेच आता वाटप केलेल्या शासकीय निवासस्थानाचे बाजारभावानुसार घरभाडे व त्यांच्या वेतनातून कपात करावयाची घरभाडे भत्ता, अनुज्ञप्ती शुल्क आणि सेवाशुल्क ही रक्कम वजा जाता फरकाची रक्कम प्राधिकरणाने स्वतःच्या निधीतून अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

"**पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** यापुढे जे शासकीय अधिकारी / कर्मचारी प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर येतात आणि शासकीय निवासस्थानात राहतात अशा अधिका-यांच्या वेतनातून शासन नियमानुसार घरभाडे भत्ता, अनुज्ञप्ती शुल्क आणि सेवाशुल्क वसूल करण्यात आल्यानंतर बाजारभावाप्रमाणे येणारे घरभाडे व वसूल करण्यात आलेली रक्कम यामधील फरकाची रक्कम प्राधिकरणाने स्वतःच्या निधीतून शासनास अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : सिकॉमकडील प्राधिकरणाची ठेव रु.२४६.१७ कोटी (मार्च, २००३) याबाबतचा अहवाल.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********

Figure 9

MUIP

# Summary of Preliminary Cost Estimate (Western & Eastern Suburbs)

| Priority | Length (km) | Cost (Rs crore) |
|---|---|---|
| **Eastern Suburbs** | | |
| Priority 1 | 155.00 | 1049.05 |
| Priority 2 | 24.20 | 229.25 |
| Priority 3 | 16.15 | 38.48 |
| **Sub Total** | **195.35** | **1316.78** |
| **Western Suburbs** | | |
| Priority 1 | 81.18 | 500.95 |
| Priority 2 | 23.70 | 50.85 |
| Priority 3 | 46 | 122.5 |
| **Sub Total** | **150.88** | **674.3** |
| **Eastern + Western Suburbs** | | |
| Priority 1 | 236.18 | 1550.00 |
| Priority 2 | 47.90 | 280.10 |
| Priority 3 | 62.15 | 160.98 |
| **Grand Total** | | |
| | **346.23** | **1991.08** |

**Master Plan for Road Network Improvement in Greater Mumbai**

**Eastern Suburbs**

**Abstract of Preliminary cost - comprehensive list of Roads and Structures (all priorities)**

| Sr. No | Road No | Name of the Road | Length (Km) | Present Width(m) | DP width(m) | Proposed width(m) | Proposals / Improvements | Est.Cost in Rs.Cr | Priority |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | E 1 | **Andheri Ghatkopar Link Road** | | | | | 6Lane divided +LRT from Andheri to Ghatkopar OR 8 lane divided+ 4L elevated road from Gurudwara Jn to Sakinaka | | Priority 1 |
| | E 1a | AGLR - Andheri Station to WEH | 1.00 | 14-17 | 27.45 | 27.45 | 6 Lane Divided | 2.55 | Priority 1 |
| | E 1b | AGLR - WEH to Gurudwara Junction | 1.30 | 17-20 | 36.6 | 36.6 | 8 Lane Divided + 4L Flyover at Chakala | 14.65 | Priority 1 |
| | E1c | AGLR - Gurudwara Junction to Sakinaka | 3.00 | 25-30 | 45.7 | 45.7 | 8 Lane Divided + 4L elevated road from Gurudwara Jn to Sakinaka +1 P.subway | 76.35 | Priority 1 |
| | E 1d | AGLR ( East of Sakinaka i.e Sakinaka to Asalpha and DP li | 2.50 | 12-17 | 45.7 | 45.7 | 8 Lane Divided+1 p.subway | 17.75 | Priority 1 |
| | E1e | AGLR ( LBS to EEH ) | 1.00 | 20 | 45.7 | 45.7 | 4 Lane Divided +4L Flyover at LBS+ROB widening | 15.10 | Priority 1 |
| 2 | E 2 | Vidya Vihar ROB (incl.Approaches connecting LBS and R.C.Marg) | 2.1Km(appr) 0.5km(ROB) | 5-7 | 24.4-27.4 | 24.4-27.4 | 4 Lane Divided + 4Lane ROB | 16.92 | Priority 1 |
| 3 | E 3a | Jari Mari Road - AGLR to Andheri Kurla Road | 1.0 | 10-18 | 27.4 | 27.4 | 4Lane Divided | 1.15 | Priority 1 |
| | E 3b | Jari Mari Road - DP Roads(18m) connecting AK Road - Sahar Airport | 0.50 | NE | 18.3 | 18.3 | 4 lane devided +2 nos of 2L Bridges | 2.33 | Priority 1 |
| 4 | E 4a | Mahakali Caves Rd From Chakala Jn to MIDC Office | 0.5 | 16-18 | 36.6 | 36.6 | 8 Lane Divided | 2.60 | Priority 1 |
| | E 4b | Mahakali Caves Rd From MIDC Office to Parsi Panchayat Rd | 1.2 | 12-16 | 18.3 | 18.3 | 4 Lane Divided | 2.52 | Priority 1 |
| 5 | E 5 | Marol Moroshi Road | 1.8 | 10-12 | 18.3 | 18.3 | 4 Lane Divided | 4.14 | Priority 1 |
| 6 | E 6 | Missing Link connecting Marol Maroshi Road with Central Road | 0.35 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 1.60 | Priority 1 |
| 7 | E 7 | Sahar Road from Airport to WEH | 3.00 | 15-20 | 27.4 | 27.4 | 6 Lane Divided Road | 7.50 | Priority 1 |
| 7 | E 7 | Sahar Road from Airport to WEH | 3.00 | 15-20 | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided Elevated Road | 51.00 | Priority 2 |
| 8 | E 8 | Gurunanak Gurudwara Marg (Dhaku Road) | 1.5 | 16-30 | 45.7 | 45.7 | 8 Lane Divided | 7.77 | Priority 1 |
| 9 | E 9 | AK Road from Sakinaka to -LBS(Kalpana theater) | 2.50 | 12 | 21.4 | 21.4 | 4 Lane Divided | 12.60 | Priority 1 |
| 10 | E 10 | Saki Vihar Road | 2.5 | 17m | 27.4 | 27.4 | 6 Lane Divided | 5.62 | Priority 1 |
| 11 | E 11 | DP road parallel to Saki Vihar Road from AGLR(JarimariJN) to JVLR(Powai) Via Chandivali | 2.20 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 7.04 | Priority 1 |

**Master Plan for Road Network Improvement in Greater Mumbai**

**Eastern Suburbs**

**Abstract of Preliminary cost - comprehensive list of Roads and Structures (all priorities)**

| Sr. No | Road No | Name of the Road | Length (Km) | Present Width(m) | DP width(m) | Proposed width(m) | Proposals / Improvements | Est.Cost in Rs.Cr | Priority |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | E 12 | Road from BK Complex to EEH at SumanNagar via Chunabatti | 2.5 | NE | 24.7 | 24.7 | 4 Lane elevated road across Creak,LBS,CR&HR tracks+ 4 Lane divided | 27.6 | Priority 2 |
| 13 | E 13 | MG Road Connecting RC Marg and LBS via Ghatkopar ROB | 1.5 | 10-17 | 18.3-27.4 | 18.3-27.4 | 4 lane divided | 1.3 | Priority 1 |
| 14 | E 14 | LBS Marg(Sion to Mulund Checknaka) | 22.00 | 12-22 | 30.5 | 30.5 | 6 Lane Divided +2 P.Subways+1 4L flyover at Mulund for GMLR | 67.60 | Priority 1 |
| 15 | E 15 | **Eastern Express Highway(EEH)** | | | | | | | Priority 1 |
| | E 15a | EEH - Sion to Suman Nagar | 2.20 | 30-35 | 61 | 61 | 12 Lane Divided+strengthening of Ex.road+widening of 2 ROBs+service Rds+1 flyover | 34.91 | Priority 1 |
| | E 15b | EEH - Suman Nagar to Ghatkopar | 2.8 | 26-28 | 61 | 61 | 8 Lane Divided+strengthening of Ex.road+1 p.subway+service Rds+1vehicle subway | 15.49 | Priority 1 |
| | E 15c | EEH - Ghatkopar to Mulund | 14.0 | 24-25 | 61 | 61 | 6 Lane Divided+strengthening of Ex.road+3 p.subway+service Rds | 47.94 | Priority 1 |
| 16 | E 16 | **Western Express Highway(WEH)** | | | | | | | Priority 1 |
| | E 16a | WEH - Bandra to Santacruz | 6.00 | 30-35 | 76.2 | 76.2 | 12Lane Divided+strengthening of Ex.road+2 flyovers(6lane) each at Kherwadi,Airport Jns+Service Rds | 76.08 | Priority 1 |
| | E 16b | WEH -Santacruz to Malad | 9.00 | 26-28 | 61 | 61 | 10Lane Divided+strengthening of Ex.road+3 P.Subways+3 V.Subway+Service Rds | 61.16 | Priority 1 |
| | E 16c | WEH - Malad to Kandivli | 4.00 | 18-20 | 61 | 61 | 10Lane Divided+strengthening of Ex.road+Service Rds+4Lane flyover at Thakur Complex+2 V.Subways | 51.12 | Priority 1 |
| | E 16d | WEH - Kandivli to Dahisar | 6.30 | 26-28 | 61 | 61 | 10Lane Divided+strengthening of Ex.road+3 P.Subways+2 V.Subways+Service Rds | 44.35 | Priority 1 |
| 17 | E 17 | Aarey Colony Road | 7.00 | 8-10 | | | 6 Lane Divided | 29.40 | Priority 1 |
| 18 | E 18 | Extension of S.G.Barve Marg(E) | 0.5 | 8-10 | 18.3 | 18.3 | 4 Lane divided | 1.05 | Priority 1 |
| 19 | E 19 | JVLR to GMLR (parallel to LBS) | 4.0 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 12.80 | Priority 1 |
| 20 | E 20 | Road parallel to LBS from AGLR(Asalpha) to JVLR(Hiranandani) | 3.7 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 11.84 | Priority 1 |

## Master Plan for Road Network Improvement in Greater Mumbai
## Eastern Suburbs
## Abstract of Preliminary cost - comprehensive list of Roads and Structures (all priorities)

| Sr. No | Road No | Name of the Road | Length (Km) | Present Width(m) | DP width(m) | Proposed width(m) | Proposals / Improvements | Est.Cost in Rs.Cr | Priority |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 21 | E 21 | Sion Dharavi Link Road up to BKC Jn | 1.6 | 16 | 27.4 | 27.4 | 4 Lane elevated road From EEH to VG Tapse Chowk on Bandra Sion Link road + Trumpet Interchange at BKC Jn | 56.20 | Priority 1 |
| 22 | E 22 | S G Barve Marg (E) | 1.2 | 16 | 45.7 | 45.7 | 6 Lane Divided | 3.00 | Priority 2 |
| 23 | E 23 | S G Barve Marg (W) | 0.9 | 16 | 45.7 | 45.7 | 6 Lane Divided | 2.25 | Priority 2 |
| 24 | E 24a | GMLR - Sec-I - WEH (Dindoshi/ Goregaon) to Film city | 3.8 | 10-18 | 45.7 | 45.7 | 4 Lane Divided | 5.29 | Priority 2 |
| | E 24b | **GMLR (Pipe line Road)** | 5.00 | NE | 36.6 | 36.6 | 4 Lane elevated road | 125.00 | Priority 1 |
| | E 24c | GMLR - Sec-III - Pipe line Road to EEH | 3.0 | 10-16 | 45.7 | 45.7 | 4 Lane Divided | 7.53 | Priority 2 |
| 25 | E 25 | Guru Gobind Sing Marg - From LBS Marg Near Johnson & Johnson Garden to GMLR | 2.0 | 12-18 | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 4.80 | Priority 3 |
| 26 | E 26 | Road from WEH to JVLR through Andheri(E) | 1.8 | 7-10 | 18.3 | 18.3 | 4 Lane Divided | 7.2 | Priority 1 |
| 27 | E 27 | Mulund Colony to Bansal Housing | 0.9 | 19 | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 2.88 | Priority 3 |
| 28 | E 28 | Road from JVLR at Tagore Nagar to Vikhroli | 1.3 | 17 | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 4.16 | Priority 3 |
| 29 | E 29 | Vidya Vihar to Vikhroli (Parallel Road to EEH in Vikhroli) | 1.8 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 5.76 | Priority 3 |
| 30 | E 30 | Ayyappa Mandir Junction on Ghatkopar Mankhurd Link Road to Ghatkopar Flyover on EEH (East Island Freeway) | 2.30 | NE | 60 | 60 | 4 Lane Divided | 7.36 | Priority 1 |
| 31 | E 31 | Ghatkopar Mankhurd Link Road | 3.9 | 18-25 | 61 | 61 | 8 Lane Divided + Flyovers at Ayyappa Mandir Junction,Gavandi Jn | 30.45 | Priority 2 |
| 32 | E 32 | Road from Tata Receiving station to GMLR Jn | 5.2 | NE | 36.6 | 36.6 | 4 Lane Divided | 16.64 | Priority 1 |
| 33 | E 33 | Road from SV road to Khatau Estate | 2.1 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 6.72 | Priority 1 |
| 34 | E 34 | Road from LT terminus to Vidya Vihar (E) | 1.5 | 8-11 | 18.3 | 18.3 | 4 Lane divided | 3.15 | Priority 1 |
| 35 | E 35 | Wadala Truck Terminal Road | 2 | 25 | 36.6 | 36.6 | 6 Lane divided | 1.2 | Priority 1 |
| 36 | E 36 | Lokhande Marg | 1.5 | 10-12 | 18.3 | 18.3 | 4 Lane Divided | 4.50 | Priority 2 |
| 37 | E 37 | Road from Waman Tukaram Marg to CMLR Via Deovnar | 2.0 | 10-12 | 18.3/27.4 | 18.3/27.4 | 4 Lane Divided | 6.40 | Priority 2 |
| 38 | E 38 | Anik Panjarpole Link Road | 6.0 | NE | 40-60 | 40-60 | 6 Lane Divided | 175.00 | Priority 1 |
| 39 | E 39a | Road from JVLR to GMLR parallel to EEH | 4.0 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 12.80 | Priority 3 |

**Master Plan for Road Network Improvement in Greater Mumbai**

**Eastern Suburbs**

**Abstract of Preliminary cost - comprehensive list of Roads and Structures (all priorities)**

| Sr. No | Road No | Name of the Road | Length (Km) | Present Width(m) | DP width(m) | Proposed width(m) | Proposals / Improvements | Est.Cost in Rs.Cr | Priority |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | E39b | Road from GMLR to Mulund parallel to EEH | 3(1km NE) | 10-12 | 27.45 | 27.45 | 4 Lane Divided | 3.20 | Priority 3 |
| 40 | E 40 | R C Marg - Ghatkopar Rly Stn. To V N Purav Marg | 3.00 | 22 | 27.45 | 27.45 | 6 Lane Divided | 15.00 | Priority 1 |
| 41 | E 41 | Jawaharlal Nehru Marg from Santacruz to SCLR | 1.8 | 18 | 27.5 | 27.5 | 6 Lane Divided | 5.76 | Priority 1 |
| 42 | E 42 | Road from Jn of R C Marg and Choitram Gidwani Marg to EEH near Suman Nagar | 1.40 | NE | 36.6 | 36.6 | 6 Lane Divided | 7.42 | Priority 1 |
| 43 | E 43 | Waman Tukaram Patil Marg | 2.0 | 16-22 | 40 | 40 | 4 Lane divided | 1.60 | Priority 3 |
| 44 | E 44a | V N Purav Marg - Suman Nagar to Panjarpole Circle | 3.0 | 28-30 | 36.6 | 36.6 | 6 Lane Divided + 4L elevated road from KurlaStn road Jn to Diamond Garden Jn | 31.50 | Priority 2 |
| | E 44b | V N Purav Marg - Panjarpole Circle to BARC | 1.4 | 32 | 53.3 | 53.3 | 8 Lane Divided | 3.50 | Priority 2 |
| 45 | E 45 | Road connecting parsipanchayat road missing link of Marol Maroshi through MIDC | 2 (0.5Km NE) | 15-17 | 18.3 | 18.3 | 4 Lane | 1.6 | Priority 1 |
| 46 | E 46 | Road from CMLR near Pumping Station to Tanaji Chowk | 0.8 | 12 | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 1.68 | Priority 1 |
| 47 | E 47 | Holker Road and road from Gavandi Stn to Mankhurd | 2.2 | 12 | 18.3 | 18.3 | 4 Lane Divided | 6.84 | Priority 1 |
| 48 | E 48 | WEH to Kole kalyan university campus road | 0.5 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 1.60 | Priority 1 |
| 49 | E 49 | WEH to Judicial Staff Quarters | 1.6 | NE | 27.4 | 27.4 | 4 Lane Divided | 5.12 | Priority 1 |
| 50 | E 50 | BKC road to CST road | 1.3 | NE | 30.5 | 30.5 | 4 Lane Divided | 4.16 | Priority 1 |
| 51 | E 51 | Road from Central Road to Dakhu Marg Jn on AGLR | 0.8 | 10-12 | 18.3 | 18.3 | 4 Lane | 1.68 | Priority 1 |
| 52 | E 52 | Access Roads to RailwayStns of Kanjurmarg,Bandup and Mulund | 3.0 | 10-12 | 15.3-18.3 | 15.3-18.3 | 2/4 Lane | 6.0 | Priority 1 |
| | | Total | 195.41 | | | | | 1316.78 | |

# Master Plan for Road Network Improvement in Greater Mumbai

## (Western Suburbs - all Priorities)

## Abstract of Preliminary cost - comprehensive list of Roads and Structures

| Sr. No. | Road No | Name of Road | Length (Km) | D P Width | Present Road Width (m) | Proposed Road Width | Proposed Improvements | Cost (Rs.Cr.) | Remarks | Pririty |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | W1 | B J Road from sea rock hotel to Carter Road Near Jetty | 1.4 | 36.6 | 18 to 20 | 36.6 | 4 lane road+bridge | 13.0 | | Priority 3 |
| 2 | W2 | Carter Road Jetty to Juhu Road (continuation to B J Road) | 3.98 | 36.6 | 15 to 32 | 36.6 | 4 lane road | 4.7 | 1km non existent | Priority 1 |
| 3 | W3 | Bandra Worli Sea Link(2.265) | | 36.6 | 36.6 | 36.6 | 8 lane road | 0.0 | BWSL | |
| 4 | W4 | Loop road to WBSL from cemetry to Mahim Interchange | 1.56 | 36.6 | 20 to 28 | 36.6 | 4 lane road | 0.5 | | Priority 3 |
| 5 | W5 | WEH to Bandra Rly Station(Ananta Kanekar Marg)+Roads to Bandra Terminous and SV Road | 1.50 | 27.45 | 15 to 20 | 27.45 | 4 lane road + V.Subway | 7.5 | | Priority 3 |
| 6 | W6 | WEH (SCLR Junction) to Western Rly near Church Road | 0.40 | 27.45 | | 27.45 | 4 lane road+improvements to ex.Subway | 2.3 | Non-existent | Priority 2 |
| 7 | W7 | Jawaharlal Nehru Road from Santa Cruz Station to WEH (Vakola Flyover) | 0.50 | 36.6 | 15-20 | 36.6 | 8 lane road | 2.0 | | Priority 1 |
| 8 | W8 | Link passing through Juhu Airport -1 (Missing) | 2.00 | 30.5 | | 30.5 | 6 lane tunnel | 60.0 | Non-existent | Priority 1 |
| b) | b) | Link passing through Juhu Airport -2 (Missing) | | 30.5 | | | | 0.0 | Non-existent | |
| 11 | W11 | Extension of VP road to Chunabhatti chowk south of Juhu Air port(0.4) | 0.40 | 27.5 | | 27.45 | | 0.0 | Under construction | Priority 1 |
| 12 | W12 | Vaikunthlal Mehta Road | 1.60 | 36.6 | 15 to 20 | 36.6 | 4 lane road+1 nos flyover | 10.4 | | Priority 1 |
| 13 | W13 | Gulmohar road from VM road to Juhu lane | 1.60 | 30.5 | 15 to 20 | 30.5 | 6 lane road | 4.0 | | Priority 1 |
| 14 | W14 | Relief Road from V M Road to Jai Prakash road | 2.60 | 30.5 | 15 to 20 | 30.5 | 4 lane road | 1.3 | | Priority 1 |
| 15 | W15 | Link connecting SV Road and Main Linking road (Barfiwala lane) | 1.50 | 36.6 | 15 to 20 | 36.6 | 4 lane road + 1 No flyover | 12.6 | 1 km non existent | Priority 1 |
| 16 | W16 | Link from Barfiwala lane to Jaiprakash Road (Vile Parle) | 1.50 | 27.45 | 15 to 20 | 27.45 | 4 lane road + 1No flyover | 12.6 | 1 km non existent | Priority 1 |
| 17 | W17 | West Coat Road | 5.86 | 36.6 | 10 to 12 | 36.6 | 4 lane road | 18.8 | | Priority 3 |
| 18 | W18 | Link from Fisheries Institute to Malad Madh Road in Versova | 3.21 | 27.45 | 5 to 10 | 27.45 | 2 lane road | 8.7 | | Priority 3 |
| 19 | W19 | Link from Relief road to Jaiprakash Road(Juhu-Versova Road) | 1.70 | 30.5 | 15 to 20 | 30.5 | 6 lane road | 4.3 | | Priority 3 |
| 20 | W20 | Jayprakash Road (J P Road) | 3.30 | 27.45 | 15 to 20 | 27.45 | 6 lane road+ 1RoB-Cum-Flyover | 45.9 | | Priority 1 |
| 21 | W21 | Link from S V Road to Versova Beach road ( JVLR Extension) | 3.32 | 36.6 | 10 to 15 | 36.6 | 4 lane road | 5.3 | Partially existing | Priority 1 |
| 22 | W22 | S V Road to WEH (Jogeshwari south ROB)(1.2) | | 39.65 | | | 6 lane road | 0.0 | Non-existent/MUTP | Priority 1 |

| Sr. No. | Road No | Name of Road | Length (Km) | D P Width | Present Road Width (m) | Proposed Road Width | Proposed Improvements | Cost (Rs.Cr.) | Remarks | Pririty |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 23 | W23 | [illegible] Road Near Jetty | 1.10 | 27.45 | 15 to 20 | 27.45 | 4 lane road | 0.5 | | Priority 3 |
| 24 | W24 | Relief road from J P Road to Pahadi Goregaon (Oshivira) | 2.50 | 38.6 | 15 to 20 | 36.6 | 4 lane road | 1.3 | | Priority 3 |
| 25 | W25 | Veer Desa Road - From J P Road to JVLR Extn. | 1.30 | 27.45 | | 27.45 | 4 lane road + 1No flyover | 14.6 | | Priority 1 |
| 26 | W26 | Road connecting to Western Relief road (near Swami Samarth Co-operative Society) | 0.70 | 27.45 | 15 to 20 | 27.45 | 4 lane road | 0.2 | | Priority 3 |
| 28 | W28 | Road from Swami Samarth Coperative housing Society to S V Road | 1.42 | 27.45 | 15 to 20 | 27.45 | 4 lane road | 0.7 | Partially Non-existent | Priority 3 |
| 29 | W29 | Link connecting Linking road to S V Road (Oshivara) | 0.70 | 27.45 | 10 to 15 | 27.45 | 4 lane road | 1.8 | | Priority 3 |
| 30 | W30 | Road connecting Western Relief road to Linking Road near Goregaon Depot. | 0.90 | 27.45 | 10 to 15 | 27.45 | 4 lane road | 2.3 | | Priority 3 |
| 31 | W31 | Road connecting Main Link Road to GMLR near Motilal Nagar (parallel to creek) | 1.80 | 27.45 | | 27.4 | 2 lane road | 4.2 | Non-existent | Priority 3 |
| 32 | W32 | Malad - Marve Road to Malvani | 2.00 | 36.6 | 8 to 10 | 36.6 | 4 lane road | 4.2 | | Priority 3 |
| 33 | W33 | Malad Madh Road, from Varsova to Marve Village | 7.10 | 27.45 | 7 to 10 | 27.45 | 4 lane road | 14.8 | | Priority 3 |
| 34 | W34 | Loop road in Madh village link from Western Relief road to Malad Madh road(1.4km) | | 27.45 | | | Not Required | 0.0 | Non Existent | |
| 36 | W36 | MHADA to Shimpavali Junction of Linking Road(Poisar Road Extension) | 2.20 | 27.45 | 15-20 | 27.45 | 4 lane road | 5.5 | | Priority 2 |
| 37 | W37 | Charkop Road from Malad-Marve road to L.T.Road | 4.00 | 18.3 | 10-15 | 18.3 | 4 lane road | 8.4 | | Priority 2 |
| 38 | W38 | TPS III,First Road (Linking Road Junction near Shimpvali TPS - III, Borivali to Western Expressway) | 2.60 | 36.6 | 15 to 20 | 27.45 | 4 lane road | 1.2 | 0.3 km non existent | Priority 2 |
| 39 | W39 | Swami Vivekananda Road to Don Bosco School on Linking Road Junction (Chandawarkar Road) | 1.70 | 27.45 | 15 to 20 | 27.45 | 4 lane road | 2.0 | 0.5km non existent | Priority 1 |
| 40 | W40 | L.T. Road From S.V.road to Gorai Creek | 4.00 | 27.45 | 15 to 20 | 27.45 | 4 lane road | 2.0 | | Priority 3 |
| 41 | W41 | Linking Road to S V Road in Borivali (Devidas Road) | 1.80 | 27.45 | 15 to 20 | 27.5 | 4 lane road | 0.9 | | Priority 1 |
| 42 | W42 | Main link road from Oshivara to Dahisar | 14.00 | 36.6 | 15 to 20 | 36.6 | 6 lane road+6 Nos Flyovers | 123.3 | 7 km missing | Priority 1 |
| 43 | W43 | Linking Road Railway Line to WEH | 1.28 | 27.45 | 15 to 20 | 27.5 | 4 lane road+ROB | 20.7 | Partly Existent | Priority 1 |
| 44 | W44 | Swami Vivekanda Road | 25.00 | 27.45 | 12 to 20 | 27.5 | 6 lane road+ 5 nos flyovers+5 nos subways | 127.4 | | Priority 1 |
| 45 | W45 | Andheri Railway Station to WEH(Parsi Panchayat Road) | 1.00 | 18.3 | 10 to 15 | 18.3 | 4 lane road | 2.5 | | Priority 1 |
| 46 | W46 | S V Road near Vile Parle Station to Brahaman Wada near WEH or Milan Subway ROB | 1.30 | 27.45 | | 27.5 | 4 lane road+ROB | 24.2 | Non Existent | Priority 1 |
| 47 | W47 | Extension of GMLR from WEH to Main linking road | 3.00 | 27.45 | 15 to 20 | 27.5 | 4 lane road + 1No flyover | 14.9 | 1.5 km non existent | Priority 1 |

| Sr. No. | Road No | Name of Road | Length (Km) | D P Width | Present Road Width (m) | Proposed Road Width | Proposed Improvements | Cost (Rs.Cr.) | Remarks | Pririty |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 48 | W48 | BJ Road from searock hotel to Carter Road Near Jetty | 4.50 | 18.3 | 7 to 10 | 18.3 | 4 lane road | 1.6 | 0.5km non existent | Priority 2 |
| 49 | W49 | Mahtma Gandhi Road | 2.00 | 18.3 | 15 to 18 | 18.3 | 4 lane road | 0.5 | | Priority 2 |
| 50 | W50 | Chunilal Girdarlal Road | 2.00 | 18.3/27.45 | 14 to 18 | 18.3/27.45 | 4 lane road | 0.5 | | Priority 2 |
| 51 | W51 | Chinch Bandar Road | 2.00 | 18.3 | 12 to 18 | 18.3 | 4 lane road | 0.5 | | Priority 2 |
| 52 | W52 | Shankar lane Road | 2.00 | 18.3 | 12 to 18 | 18.3 | 4 lane road+ROB cum Flyover | 14.1 | 0.4km Non-existent | Priority 2 |
| 53 | W53 | Poisar Road(WEH to Linking road) | 2.00 | 36.6/27.45 | 10 to12 | 36.6/27.45 | 4 lane road | 6.9 | 0.5km non existent | Priority 2 |
| 54 | W54 | Malad Marve Road(From Malvani to Malad-Madh Rd JN) | 2.00 | | 10 to 12 | 27.5 | 2 lane road | 1.0 | | Priority 3 |
| 55 | W55 | Gaondevi road in Kandivali | 2.00 | 27.4 | 5-12 | 27.5/18.3 | 4 lane road+2lane ROB | 16.7 | | Priority 3 |
| 58 | W58 | Malad ROB and flyover and appr. On Ramachandra lane & Dattawadi road | 4.00 | 13.2-18.3 | 12-18 | 18.3 | 2 lane ROB and app.2/4 lane | 15.2 | 1.2km ROB+2.8Km appr | Priority 3 |
| 59 | W59 | Link between SV road amd WEH in Goregaon(Aarey Road) | 2.00 | 13.2 | 5-10 | 13.2 | 2 lane road+2 lane ROB | 12.6 | | Priority 3 |
| 60 | W60 | Acces Roads to Railway stations of Khar, Santacruz, VileParle, Jogeswari, Goregaon, Kandivili and Bonvili | 7.00 | 13.2-18.3 | 10-12 | 13.2-18.3 | 2/4 lane | 14.0 | | Priority 1 |
| | | Total length in km | 150.87 | | | | | 674.3 | | |